**कार्यकारी अभियंता**
**मध्यम प्रकल्प विभाग क्र.२, कोल्हापूर**
सिंचन भवन, ताराबाई पार्क, कोल्हापूर ४१६००३
☎०२३१-२६५०५०२.
ई मेल — eempd2@gmail.com

**EXECUTIVE ENGINEER**
**Medium Project Dn. No.2, Kolhapur**
Sinchan Bhavan, Tarabai Park,
Kolhapur
☎0231-2650502
E-Mail- empd2@gmail.com

जा.क्र.मप्रवि-2/प्रशा-3/ ५७०८ /2021 — दिनांक २८/ 12 /2021

प्रति,

**मा. अधीक्षक अभियंता,**
**जलसंपदा ई-प्रशासन मंडळ,**
**जलसंपत्ती भवन,**
**कोथरुड, पुणे -४११०३८**

**विषय :-** **संकेतस्थळावरील नोटीस प्रसिध्दीबाबत..**
**मौजे. जांबरे ता. चंदगड जि. कोल्हापूर-** पोहोच कालव्यातील वाढीव क्षेत्रासाठी खाजगी जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे खरेदी करणेबाबत..
संकेतस्थळावर भूसंपादन नोटीस प्रसिध्द करणेबाबत.

संदर्भ :- १)उपविभागीय अधिकारी, गडहिंग्लज उपविभाग, गडहिंग्लज यांचे पत्र जा.क्र.भूसं/खा.वा.प्र/एसआर/०४/१८ दि.०६/१२/२०२१.
२)उपविभागीय कार्यालयाचे पत्र जा.क्र.लपाबांउवि-२/प्रशा/३५८/२०२१ दि.१६/१२/२०२१.

उपरोक्त विषयांस अनुसरून जांबरे मध्यम प्रकल्प ता. चंदगड जि. कोल्हापूर या प्रकल्पाच्या पोहोच कालव्यातील वाढीव क्षेत्रासाठी खाजगी जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी करणेबाबत भूसंपादनाची जाहीर नोटीस दि. २०/०४/२०२१ रोजीच्या दै. क्रांतीसिंह या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्दीस देणेत आलेली होती. सदरची नोटीस जलसंपदा विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबतच्या सूचना उपविभागीय अधिकारी, गडहिंग्लज उपविभाग, यांनी संदर्भिय पत्र क्र. १ अन्वये कळविले आहे. तरी कोल्हापूर जिल्हयातील तमाम लोकांना कळविणेसाठी सदर नोटीस जलसंपदा विभागाच्या https://wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत यावी ही विनंती.

हे आपले माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर.

स्थळ प्रत का.अ. यांस मान्य असे.

सोबत : प्रसिध्दीसाठी नोटीस

Suhas

उपकार्यकारी अभियंता,
मध्यम प्रकल्प विभाग क्र.२,
कोल्हापूर.

| ल. पा. बां. उ. वि. क्र. २ चंदगड | |
|---|---|
| आवक क्र. | 630 |
| दिनांक | २८/१२/२०२१ |
| उ.वि.अ. | [signature] |
| क. लिपिक | ✓ |
| प्रकरण | |

प्रत : उपविभागीय अभियंता, लघु पाटबंधारे बांधकाम उपविभाग, क्र. २ चंदगड यांना माहितीसाठी रवाना.

smitashindePD3/miscellaneous letter/जांबरे नोटीस संकेतस्थळ

Scanned with CamScanner

# महाराष्ट्र शासन,
# महसूल व वन विभाग
# उपविभागीय अधिकारी,गडहिंग्लज
## जांबरे मध्यम प्रकल्प ता. चंदगड, जि.कोल्हापूर
## -:भूसंपादनाची जाहीर नोटीस :-

कोल्हापूर जिल्ह्यातील तमाम लोकांना या नोटीसीद्वारे कळविणेत येते की, विभाग गडहिंग्लज तहसिल व तालुका चंदगड पैकी मौजे जांबरे,ता. चंदगड येथील खालील अनुसुचीमध्ये दर्शविल्याप्रमाणे जमीन धारकांच्या जमिनी मा. राज्यपाल महाराष्ट्र शासन यांच्या नावे जलसंपदा विभागाचे प्राधीकृत प्रतिनिधी कार्यकारी अभियंता, मध्यम प्रकल्प विभाग क्रमांक २,कोल्हापूर यांनी कोल्हापूर जिल्ह्यातील, चंदगड तालुक्यातील जांबरे मध्यम प्रकल्प पोच कालव्यातील वाढीव क्षेत्रासाठी आवश्यक जमिनी महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाची शासन निर्णय क्र. संकीर्ण-०३/२०१५/प्रक्र.-३४/अ-२, दिनांक १२ मे, २०१५, शासन निर्णय सुधारणा ३० सप्टेंबर, २०१५, शासन परिपत्रक क्र. एलक्युएन-०१/२०१७/ प्र.क्र.-१२/अ-२ दिनांक २५ जानेवारी, २०१७, शुध्दीपत्रक दि २८ ऑगस्ट, २०१७ व २७ सप्टेंबर, २०१७ मधील तरतुदीनुसार मा.जिल्हाधिकारीसो कोल्हापूर यांचे पत्र क्र. जा.क्र./भूसं/कार्या-११/आरआर/१५१/२०१८ दिनांक १२/०६/२०१८ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार खाजगी वाटाघाटीने सरळ खरेदी पद्धतीने सार्वजनिक प्रयोजनासाठी खरेदी करणेचे प्रस्तावित केले आहे.

यातील खालील अनुसुचीमध्ये संबंधित जमीन मालकाचे नांव, गट नंबर व संपादन क्षेत्र इ. तपशील नमूद केला आहे. सदर सुची ही या नोटीसीचा भाग समजण्यात यावा, जमिनीबाबत जमीन मालकाच्या हिश्यावर हक्क, हितसंबंध, दत्तकपत्र, वारसाहक्क, गहाण, दान, बोजा, बाकी, लिज, कर्ज, बक्षिसपत्र, जप्ती, करारमदार व इतर हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाच्या आंत पुराव्यानिशी लेखी तक्रार कार्यालयीन वेळेत (सकाळी १०.०० ते सायं. ५.०० पर्यंत) समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने इकडील कार्यालयास कळवावे.

मात्र सदर नोटीस प्रसिद्ध होवुनही नोटीशीत नमुद मुदतीत कोणीही त्यांच्या हक्काबाबत कोणतीही लेखी तक्रार अगर हरकत न केल्यास सदर मिळकतीमध्ये त्यांचे असलेले हक्क व हितसंबंध सोडून दिले असे ग्राह्य मानून सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जी व निजोखमीची असल्याचे समजून इकडील कार्यालय मुदतीनंतर केव्हांही पुढे सरळ पद्धतीने संपादनाची/खरेदीची कार्यवाही पूर्ण करतील. तदनंतर कोणाची हरकत वा तक्रार असल्यास तशी हरकत वा तक्रार आमचे अशिल व सदर मिळकतींवर कायद्याने बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी. म्हणून दिली संपादन पूर्व /खरेदीपूर्व नोटीस.

दिनांक १२/०४/२०२१

### अनुसुची

**कामाचे नाव:-जांबरे मध्यम प्रकल्प ता. चंदगड, जि.कोल्हापूर प्रकल्पासाठी पोच कालव्यातील वाढीव क्षेत्रासाठी खाजगी जमीन खाजगी वाटाघाटीने खरेदी करणे.**

| अ.क्र. | गट क्रमांक | गांव | संपादित क्षेत्र हेक्टर आर | जमीन मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | ९२ पैकी | जांबरे | ०.१५.०० | श्रीमती लक्ष्मी नागोजी गावडे |
| | | | | शिवाजी नागोजी गावडे |
| | | | | अरूण नागोजी गावडे |
| | | | | सुनिता चंद्रकांत सावंत |
| | | | | वासंती उर्फ मनिषा संभाजी सावंत |
| | | | | सुजाता उर्फ अनुसया बाजीराव दळवी |
| २ | ९४ पुर्ण | जांबरे | ०.२५.०० | लुमाजी सटू गावडा |
| ३ | ९७ पैकी | जांबरे | ०.०३.०० | यशवंत शंकर गावडे |
| | | | | विठ्ठल शंकर गावडे |
| | एकूण संपादन क्षेत्र हे.आर | | ०.४३.०० | |

**स्थळ :- गडहिंग्लज**
**दिनांक :- १२/०४/२०२१**

सही/-
**(एस.आर.पाटील)**
कार्यकारी अभियंता,
मध्यम प्रकल्प विभाग क्र.२, कोल्हापूर

सही/-
**(विजया पांगारकर)**
उपविभागीय अधिकारी,
गडहिंग्लज विभाग, गडहिंग्लज

सही/-
**(आर.एस.कन्नुर)**
सहाय्यक सरकारी वकील/
संपादन मंडळाचे पॅनेल वरील वकील

सही/-
**(सुहास बायचळ)**
सहा.अभियंता श्रेणी १,
ल.पा.बां.उप विभाग क्र.२, चंदगड

**जिमाका/को/जाही/का-४/५/२०२१-२०२२**

Scanned with CamScanner